# दिनांक 03/04/2025

**1.** महाड तालुका पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/04/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास मौजे भोमजाई मोहल्ला येथे फिर्यादीचे घराचे अंगणात येथे आरोपीत रा. भोमजाई मोहल्ला पोस्ट मुमुर्शी ता महाड हा फिर्यादीस माझेकडे रागाने का बघतोस? असे म्हणुन फिर्यादीस शिवीगाळी करून हाताने मारहाण केली त्यावेळी फिर्यादीचे वडील हे भांडण सोडविण्यास आले असता आरोपीत याने त्याचे काखे मध्ये दाताने चावा घेवुन तसेच उजवे हाताचे अंगठयास दाताने चावा घेवुन अंगठयाचे एक पैर तोडुन काढुन गंभीर दुखापत केली तसेच हातातील स्टिलच्या पाईपने फिर्यादी यांचे घराच्या खिडक्याच्या काचा फोडुन नुकसान केले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 02/04/2025 रोजी 22:25 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड तालुका पोलीस ठाणे गुरनं. 15/2025, BNS 2023 चे कलम 118 (2),115 (2),352,324 (4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई .श्री.सदाशिव गायकवाड हे करीत आहेत.

**2.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 30/03/2025 रोजी 16:30 वा च्या सुमारास मौजे चांदोरे गावचे हददीत माणगांव येथे आरोपीत चालक , रा. मोबनुर ता.पारसगड जि बेळगाव यांचे ताब्यातील टाटा ट्रक क्रम्ंक- के.ए 22/ए.ए-0495 ही श्रीवर्धन ते कर्नाटक अशी चालवित घेवुन जात असताना मौजे चांदोरे गावचे हददीत स्मशानभुमीचे पुढे वळणावर आलेवेळी आरोपीत चालक यांने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने व हयगयीने बेदरकारपणे वाहन चालवुन अपघात झाला असुन सदर अपघातात ट्रक मधील क्लीनर पुडलीक पाटील याचे किरकोळ व गंभीर स्वरुपाचे दुखापतीस तसेच वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 72/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 125a ,125b,281,324(4)(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/रावसाहेब कोळेकर हे करीत आहेत.

**3.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे कोंडेथर गावचे हददीत पुणे माणगांव रोडवर ताम्हाणी घाटामध्ये हॉटेल गारवा जवळ येथे फिर्यादी रा.भुवन ता.माणगाव हे स्वत:चे ताब्यातील टाटा 407 टीपर गाडी क्रं एम.एच.05/ बी.डी.0269 हीने आधारवाडी ता.मुळशी पुणे येथे खडीचा माल खाली करुन परत कोलाड येथे जात असताना कोंडेथर गावचे हददीत पुणे माणगांव रोडवर ताम्हाणी घाटामध्ये हॉटेल गारवा

जवळ आलेवेळी आरोपीत चालक रा. दापोली जि रत्नागिरी यांने त्याच्या ताब्यातील एस.टी बस क्रंमाक-एम.एच 09/एफ.एल-1083 ही राँग साईडला आणुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने व हयगयीने बेदरकारपणे वाहन चालवुन अपघात केला असुन सदर अपघातात फिर्यादी यांचे किरकोळ व गंभीर स्वरुपाचे दुखापतीस तसेच दोन्ही वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 73/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 125a,125b,281 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/प्रफ्फुल पवार हे करीत आहेत.

**4.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 03:00 वा च्या सुमारास मौजे सावरोली गावच्या हददीत मुंबई पुणे एक्सप्रेसवे पुणे लेनवर किं.मी.नं.33 जवळ ता.खालापुर येथे आरोपीत चालक रा.कलाल मोहल्ला भोजरास जि.भिलवाडा राजस्थान याने त्याचे ताब्यातील आयशर टेम्पो क्रमांक एम.एच.12 व्हि.एफ.1207 हा मुंबई ते पुणे असा मुंबई पुणे एक्सप्रेसवे ने निष्काजीपणे चालवुन पुणे बाजुकडे जाणा-या अज्ञात वाहनाचे मागील बाजुस टेम्पोची ठोकर मारुन अपघात होणेस व टेम्पोमधील क्लिनर अखिलेशकुमार हिरा यादव याचे दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 113/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भा.न्या.सं.2023 चे 281,125(a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/सावंत हे करीत आहेत.

**5.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 12:15 वा च्या सुमारास मौजे आर.सी.एफ.काटा गेट थळ ता.अलिबाग, येथे फिर्यादी रा.राजमाळा , पो.थळ ता.अलिबाग यांचे पिकअप वरील चालक हे लेबर आणण्यासाठी गेले असता तेथे आरोपी क्र 1 यांच सुपरवायझर याचे फोनवरुन फोन करुन काटा गेट येथे बोलवून घेऊन फिर्यादी यांने आरोपीत याचे कडील कामगार व गाडया फिर्यादी याच्या कॉन्ट्रक्ट साठी घेतल्या नाहीत यांचा आरोपी क्र 01 यास राग आल्याने आरोपी क्र 01, आरोपी क्र 02 व 03 सर्व रा.थळ बाजार ता.अलिबाग यांनी फिर्यादी यांना संगनमत करुन हाताबुक्याने मारहान केली. तसेच तु कंपनी कॉन्ट्रक्ट करीता माझ्या गाडया व कामगार वापरले नाही तर तु मला महिन्याला 50,000/-रुपये दे असे म्हणुन पैश्याची मागणी केली तसेच पैसे दिले नाहीस तर मी तुला बघुन घेईन अशी धमकी दिली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.59/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 308(3),115(2),352,351(2),351(3),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/ सोनकर हे करीत आहेत.

**6.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 14:40 वा च्या सुमारास मौजे भाल स्टॅाप येथील पाटील पोल्ट्री जवळ अलिबाग मांडवा रोडवर येथे फिर्यादी यांचे ताब्यातील चारचाकी वाहन महिंद्रा कॅम्पर क्रमांक एम एच 09 एफ एल 4630 ही घेवुन धाटाव रोहा येथुन

अलिबाग मांडवा रोडने अलिबागकडे येत असताना भाल स्टॉप येथील पाटील पोल्ट्री जवळ आलेवेळी समोरुन विरुदध दिशेने येणारी दुचाकी ओला गाडी क्रमांक एम एच 06 सी के 0587 ही वरील चालक त्याचे ताब्यातील दुचाकी नागमोडी चालवित येवुन रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेरदरकारपणे चालवित येवुन फिर्यादी यांचे ताब्यातील वाहनाला उजव्या बाजुस ठोकर मारलेने आरोपी हा गाडीवरुन पडुन त्याचे डोक्यास,उजवे पायास,उजवे हातास गंभीर दुखापती झाल्या तसेच त्याचे गाडीचे मोठया प्रमाणात नुकसानीस कारणीभुत झाला तसेच फिर्यादी चालवीत असलेल्या चारचाकी वाहनाचे समोरील आरसे, पुढील जाळी व काच फुटुन नुकसान केले.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं. 60/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(A)125(B) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/विलास आंबेतकर हे करीत आहेत.

**7.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 03:45 वा च्या सुमारास मौजे इसाने कांबळे गावचे हददीत मुंबई गोवा महामार्गावर गोवा लेनवर ता. महाड येथे फिर्यादी. सैनिकनगर, पोलादपुर, हे त्यांचे ताबेतील टाटा कंपनीचा डफर क्र. एम.एच.06/ बी.डब्लु./9923 चालवित घेवुन जात असताना इसाने कांबळे गावचे हददीत मुंबई गोवा महामार्गावर गोवा लेनवर आलेवेळी फिर्यादी यांचे पाठीमागुन येणा-या हिरो कंपनीचे स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम.एच./50/एक्स/4104वरिल आरोपीत चालक रा आल्मेडा कंपाउंड प्रतिक्षानगर सायन मुंबई याने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन व दारु पिवुन अति वेगाने हयगयीने बेदारकारपणे व दोन वाहनांमध्ये सुरक्षित अंतर न ठेवता मोटारसायकल चालवुन फिर्यादी यांचे मोटारसायकलला पाठीमागुन ठोकर मारुन अपघात करुन अपघातात फिर्यादी व स्वत:चे किरकोळ तसेच गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.)पोलीस ठाणे गुरनं. 36/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(ए),125 (बी),मोटार वाहन अधि.184,185 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/जाधव हे करीत आहेत.

**8.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/08/2023 रोजी 00:00 वा ते दि. 02/04/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे मुळगाव येथे आरोपीत क्र.1 ते 3 यांनी संगणमत करून या फिर्यादी रा.डी-1, 303, माउंटन व्ह्यू रेसीडन्सी, वासरंग रोड, वासरंग, खोपोली, ता.खालापूर यांचेशी ओळख वाढवून, फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून फिर्यादी यांच्या मालकीच्या कंपनीच्या नावाने बिझनेस लोन करुन त्यापैकी 10,80,000/- रुपये नेरे-पनवेल येथील बांधकाम परवान्याकरिता, 13,80,000/- रुपये बँक गॅरंटी करिता तसेच इतर वेगवेगळ्या कारणाकरिता 70,000/- रुपये गुगल-पे द्वारे ऑनलाईन स्वरुपात असे एकुण 25,30,000/- रुपये घेतले असुन ते आजपावेतो परत केलेले नाहीत तसेच फिर्यादी यांच्या नावे खरेदी केलेल्या महिंद्रा एक्सव्हीयु 700 या कारचे 29,18,000/- रुपये बँक लोन करुन कार खरेदी करुन बॅक हफ्ते भरलेले नाहीत

अथवा ती कार फिर्यादी यांच्या ताब्यात दिलेली नाही. तसेच साक्षीदार क्र.1 यांची स्कुल बसची खरेदी करण्यासाठी बँक लोन करुन देण्यासाठी व साक्षीदार क्र.2 यांना पर्सनल लोन करुन देण्यासाठी घेतलेले असे दोन्ही साक्षीदार यांचे 2,50,000/- रुपये परत केले नाहीत. आरोपीत क्र.1 ते 3 यांनी फिर्यादी व साक्षीदार 1 व 2 यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांची 25,30,000/- रुपयांची आर्थिक फसवणूक केली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं.93/2025, बीएनएस 2023 चे कलम 316(2) ,318(4) , 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री हणमंत पवार हे करीत आहेत.

**9.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/04/2025 रोजी 12:00 वा च्या सुमारास मौजे पराडे ते सावरोली रोडवर सिध्देश्वरी चौकात , खालापूर येथे आरेपीत रा. पुरेटकघ्न ता. गौरीगंद जि. अमेठी राज्य - उत्तरप्रदेश याने आपले ताब्यातील टँकर क्रख् 16 ऋज् 5160 हा पराडे ते सावरोली रोडवर चालवित जात असताना सिध्देश्वरी चौकात आल्यावेळी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवून चावणे रोडने योणारा फिर्यादीचा चुलत भाउ याचे सुपर स्पेंडर मोटार सायकल क्र . एमएच 46 बी. पी.9891 हिस धडक देवुन अपघात करुन गंभीर दुखापतीस व मोटारसायकलचे नुकसानीस कारणीभूत झ्राला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.76/2025, बी.एन.एस कलम 281,125(a),125 (b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा /पानपटटे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 02.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 238 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,62,250/-रुपये इतका दंड आकारला आहे.